# समर्थ कंट्रक्शन, मोहिनीराज कंट्रक्शन, संदीप इलेक्ट्रिकल व साबेर कंट्रक्शन यांच्यावर गुन्हे दाखल करा


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564






■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १७८ ■ सोमवार दि.१७ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 178 ■ Monday Dt. 17 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# न.प.ला लुटणारा 'बीडचा वाल्मिक' गणेश पगारे

## बीड नगर परिषदेने नियुक्त केलेल्या समर्थ व मोहिनीराज कंट्रक्शन, संदीप इलेक्ट्रिकल, साबेर कंट्रक्शन व न.प.च्या विरोधात १९ मार्चपासून उपोषण : अक्षय कोकाटे

## सीबीआयकडे तक्रार तरीही बीड नगर परिषदेचा वाल्मिक म्हणजे गणेश पगारे, निता अंधारेच्या आशीर्वादाने सुरक्षित?

## स्वर्णजयंती शहरी नगरोत्थान योजना, दलितवस्ती सुधार योजनेच्या भ्रष्टाचार कामाशी सखोल चौकशी करून कारवाई करा – अक्षय कोकाटे



बीड । प्रतिनिधी

**बीड शहरातील नगर परिषद, बीड अंतर्गत लोकशाहीर आण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत होत असलेल्या सिमेंट रोड व नालीचे कामे निकृष्ट दर्जाची कामे होत असल्याने चौकशी होवून समर्थ कन्स्ट्रक्शनवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपोषण केले जाणार आहे. या मागणीसाठी रिपाई आठवले गटाचे शहर संघटक सचिव अक्षय कोकाटे १९ तारखे पासून उपोषण करणार आहेत. बीड नगर परिषद अंतर्गत सध्या लोकशाहीर आण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेच्या माध्यमातून बीड शहरातील विविध ठिकाणी समर्थ कन्स्ट्रक्शन मार्फत पुढील कामे चालु आहेत.**

बीड नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्र. ३ मध्ये रामतिर्थमध्ये आण्णाभाऊ साठे पुतळा ते दशरथ दळवी, जानु जगताप ते सीताबाई आरे, सीताबाई आरे ते सखाराम तांबरे यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता नाली बांधकाम करणे. बीड नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्र. ३ मध्ये शुक्रवार पेठ मस्जिद ते विप्रनगर पुल पर्यंत सी.सी. रस्ता व नाली बांधकाम करणे.

बीड नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्र.३ मध्ये हनुमान नगर, लहुजी साळवे चौक ते पवार यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता व नाली बांधकाम करणे.

बीड नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्र. ०४ मध्ये बलभीम नगर येथे वाल्मिकी सभागृहाच्या पाठीमागील बाजु ते दत्तात्रय टकले यांच्या घरापर्यंत सी.सी.रस्ता व नाली बांधकाम करणे.बीड नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्र. ०४ मध्ये रेगुले किराणा ते नरेश पिसाळ, वीरशैव कॉलनी, आदिती किराणा ते गवंडर यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता व नाली बांधकाम करणे.उपरोक्त कामे व इतर ठिकाणी विविध कामे चालु असून बीड शहरामधील दलित वस्तीचे पूर्ण कामे हे समर्थ कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आल्याचे खात्रीपुर्वक माहिती प्राप्त झाली आहे. परंतू सदरील कामे हे निकृष्ट दर्जाचे असून दर्जाहीन आहेत. सदरचे कन्स्ट्रक्शन हे खोदकाम न करता, सिलींग न करता, पी.सी.सी. न करता, थेट थर टाकला जातो व उंची मनाल वाटेल तसे इंचामध्ये घेतात, ते अधिकाऱ्यांशी संगनमत करून इन्पेक्शन न घेऊ देता किंवा सॅम्पल न चेक करता होत आहेत. तसेच बोगस बील उचलण्यात येत आहेत. सदर कामाच्या संदर्भात बहुतांश ठिकाणी लांबी / रूंदी जास्त दाखवून त्या नियमानुसार कामे होत नाहीत. त्यामुळे बीड शहरातील जे रस्ता नालीचे लकाम चालु आहे. त्या समर्थ कन्स्ट्रक्शन वरती योग्य ती कार्यवाही होऊन कामामध्ये सुधारणा आणणे गरजेचे आहे.

जर संबंधित समर्थ कन्स्ट्रक्शन वर कार्यवाही झाली नाही तर मी निर्वेदक आजरोजी जाहीर करतो की, बीड शहरातील सर्व कामांचा दर्जा योग्य रहाव व त्याचा सर्वसामान्य जनतेला न्याय मिळावा म्हणून दिनांक १९ मार्च २०२५ रोजी न्यायिक व रितसर मार्गाने उपोषणास बसणार आहे. त्यामुळे वरील समर्थ कन्स्ट्रक्शनची योग्य ती चौकशी होऊन, चौकशीमध्ये दोषी आढळल्यास समर्थ कन्स्ट्रक्शनला काळ्या यादीत टाकून मान्यता रद्द करण्यात यावी व त्यांची देयके थांबविण्यात यावीत, ही अशी मागणी करण्यात आली आहे तर.सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान महाअभियान व दलित वस्ती योजनेमधून शहरात बसविण्यात येणाऱ्या सोलार पोल हायमास्ट दिवे बसविणाऱ्या कंन्स्ट्रक्शन कडून निकृष्ट दर्जाचे सामान वापरून साहित्य खरेदीत भ्रष्टाचार करणाऱ्या एजन्सीचे देयक थांबविणे यावीत

बीड नगर परिषदेच्या वतीने नगरोत्थान महाअभियान व दलीत वस्ती अंतर्गत सोलार पोल हायमास्ट दिवे शहरात बसविण्यात येत आहेत. सदरील कामास ५ कोटी २५ लाख रुपयांची मान्यता देण्यात आली आहे व दलीत वस्ती अंतर्गत हायमास्ट दिवे व सोलार पोल बसविण्यासाठी १ कोटी रुपयांची मान्यता दिलेली आहे. सदरील कामे मा. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड तसेच न.प. अभियंता उदय ईपिल्ले यांच्या संबंधित मोहीनीराज कंन्स्ट्रक्शन व संदिप इलेक्ट्रीकल यांच्याकडून १ कोटी रुपये सोलार पोल व हायमास्ट दिवे बसविण्याचे काम करण्यात येत आहे व नगरोत्थान अभियानातून ५ कोटी २५ लाख रुपयाची सोलार पोल व हायमास्ट दिवे बसविण्याचे काम साबेर कन्स्ट्रक्शन, पाटोदा यांचेकडून करण्यात येत आहे.

वरील दोन्ही कामात भ्रष्टाचार करण्यात आला असून या कामात निकृष्ट दर्जाचे सामान वापरून सामान खरेदीत न.प. मुख्याधिकारी यांच्या संगनमताने भ्रष्टाचार केला आहे. या प्रकरणी संबधिताची चौकशी करण्यात यावी, या करीता दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी आपणास निवेदन सादर करण्यात आले होते. परंतू आजपर्यंत कसलीही कारवाई आपल्याकडून करण्यात





आलेली नाही. सोलार पोल हाय मासदीवे बसवण्यात आलेले साहित्य खरेदीत भ्रष्टाचार करणाऱ्या थांबवावेत.सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान महाअभियान व दलित वस्ती योजनेमधून शहरात बसविण्यात येणाऱ्या सोलार पोल हायमास्ट दिवे बसविणाऱ्या कंन्स्ट्रक्शन कडून निकृष्ट दर्जाचे सामान वापरून साहित्य खरेदीत भ्रष्टाचार करणाऱ्या एजन्सीचे देयक थांबविणे यावीत.

बीड नगर परिषदेच्या वतीने नगरोत्थान महाअभियान व दलीत वस्ती अंतर्गत सोलार पोल हायमास्ट दिवे शहरात बसविण्यात येत आहेत. सदरील कामास ५ कोटी २५ लाख रुपयांची मान्यता देण्यात आली आहे व दलीत वस्ती अंतर्गत हायमास्ट दिवे व सोलार पोल बसविण्यासाठी १ कोटी रुपयांची मान्यता दिलेली आहे. सदरील कामे मा. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड तसेच न.प. अभियंता उदय ईपिल्ले यांच्या संबंधित मोहीनीराज कंन्स्ट्रक्शन व संदिप इलेक्ट्रीकल यांच्याकडून १ कोटी रुपये सोलार पोल व हायमास्ट दिवे बसविण्याचे काम करण्यात येत आहे व नगरोत्थान अभियानातून ५ कोटी २५ लाख रुपयाची सोलार पोल व हायमास्ट दिवे बसविण्याचे काम साबेर कन्स्ट्रक्शन, पाटोदा यांचेकडून करण्यात येत आहे.

वरील दोन्ही कामात भ्रष्टाचार करण्यात आला असून या कामात निकृष्ट दर्जाचे सामान वापरून सामान खरेदीत न.प. मुख्याधिकारी यांच्या संगनमताने भ्रष्टाचार केला आहे. या प्रकरणी संबधिताची चौकशी करण्यात यावी, या करीता दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी आपणास निवेदन सादर करण्यात आले होते. परंतू आजपर्यंत कसलीही कारवाई आपल्याकडून करण्यात आलेली नाही, त्याची सखोल चौकशी



करून एजन्सीला ब्लॅकलिस्ट करावे व कारवाई करावी. अन्यथा जिल्हाधिकारी कार्यासमोर १९ मार्च पासून लोकशाही मार्गाने उपोषण आंदोलन करण्यात येणार आहे. अशी माहिती बीड शहर रिपाई चे संघटक सचिव अक्षय कोकाटे यांनी निवेदनाद्वारे कळवले आहे.

# जागतिक पहिले वृक्षसंम्मेलन भरलेल्या सह्याद्री देवराई वनप्रकल्पाला घरघर




## दिड वर्षांपासून झाडांना पाणी मिळेना वनविभागासह जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेशरमांची झाडे लावा लक्ष्यवेधी आंदोलन

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पालवण येथील डोंगरावर २०१७ साली मराठी अभिनेते सयाजी शिंदे आणि सिने पटकथा लेखक अरविंद जगताप यांच्या प्रयत्नातून उभारलेल्या आणि पहिले जागतिक वृक्षसंम्मेलन भरलेल्या सह्याद्री –देवराई वनप्रकल्पाकडे वनविभाग आणि जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष असुन वनप्रकल्पाला घरघर लागली असुन वाळवंट होण्याच्या स्थितीत असुन पाण्याअभावी झाडे वाळली आहेत त्यामुळे पाण्यासाठी जिल्हा नियोजन समिती मधुन निधीची तरतूद करण्यात यावी तसेच डोंगराला आग लागण्याच्या घटना वारंवार घडत असुन आवश्यक उपाययोजना करण्यात यावी आणि पालवण –पिंपळवाडी रस्त्याच्या दुरावस्थेमुळे मॉर्निंग वॉक साठी नागरीक तसेच योगा ग्रुपने मॅरेथॉन स्पर्धेकडे पाठ फिरवली असुन रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी या प्रमुख मागण्यांकडे जिल्हा प्रशासन व वनविभागाचे लक्ष्य वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१७ सोमवार रोजी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेशरमांची झाडांची लागवड करत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन निवासी उपजिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, पालकमंत्री अजित पवार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात शेख युनुस, सुदाम तांदळे, रामनाथ खोड, शेख मुबीन, पांडुरंग हराळे, शेख मुस्ताक, शिवशर्मा शेलार आदी सहभागी होते.

**जिल्हा नियोजन समितीमधून झाडांना पाण्याची तरतूद करण्यात यावी**

बीड जिल्ह्यात दिड टक्का वनक्षेत्र असुन दुष्काळाचे वारंवार संकट ओढावत आहे. जिल्ह्यातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग रूंदीकरणाच्या कामामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झालेली आहे. या संकटावर मात करून वृक्ष चळवळ वाढीस लागावी म्हणून बीड तालुक्यातील पालवण येथील डोंगरावर २०१७ साली मराठी अभिनेते सयाजी शिंदे आणि लेखक अरविंद जगताप यांच्या प्रयत्नातून ४० एकरात सह्याद्री देवराई वन प्रकल्प उभारला गेला. जगातील पहिले वृक्षसंम्मेलन याच ठिकाणी झाले या प्रकल्पातील १६ एकरात करवंद, पिंपळ, लिंब, महारूक, कांचन यासह स्थानिक प्रजातीच्या ६४ हजार विविध वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. शिवाय १२ हजार झाडांचे घनवृक्षही येथे उभारण्यात आले होते. या प्रकल्पातुन आक्सिजन झोन तयार करून वृक्ष चळवळ निर्माण करण्याचा उद्देश होता. परंतु मागील दिड वर्षांपासून देवराईतील झाडांना पाणीच नसल्याने झाडे वाळली आहेत. जळु लागली आहेत.

सह्याद्री देवराई प्रकल्पातील झाडे जगवण्यासाठी जिल्हा नियोजन समिती मधुन २०१७ नंतर सुरूवातीला केवळ ३ वर्षच निधी मिळाला.त्यानंतर निधीचे प्रयोजन संपले. त्यामुळे जिल्हा नियोजन समितीमधुन पाण्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी. दोन वर्षांपूर्वी बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेटचे चेअरमन सुरेश कुटे यांच्याकडून सह्याद्री देवराई प्रकल्पातील झाडांसाठी २ दिवसाआड १२ हजार लिटर पाण्याचे मोफत टँकर दिले जात होते ते सध्या बंद आहेत. रोटरी क्लब, विविध सामाजिक संस्थांच्या मदतीने छोटे मोठे टँकर देऊन पाणी उपलब्ध करून देण्यात येत होते सध्या तेही बंद आहे.

**सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील डोंगराला वारंवार आगीची झळ ; आवश्यक उपाययोजना करण्यात यावी**

३ वर्षांपूर्वी पालवण येथील सह्याद्री देवराईच्या डोंगराला १२ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारच्या वेळी अचानक लागलेल्या आगीत १८ प्रजातींची ३२३ झाडांना आगीची झळ बसुन १३ मोठ्या झाडांचे नुकसान झाले होते तर १० मार्च २०२२ रोजी गवळवाडी रोपवन आगीत भस्मसात झाले होते तर दि.२५ मार्च २०२३ रोजी लागलेल्या आगीत शासनाच्या ३३ कोटी वृक्षलागवड योजनेंतर्गत २०१९ मध्ये पिंपळवाडी रस्त्यावर गवळवाडी येथील सर्व्हे नंबर ३७८ मधील २५ हेक्टर क्षेत्रात उभारलेल्या रोपवनाला दि.०९ मार्च २०२३ रोजी आग लागुन १० एकर क्षेत्रातील ४–५ हजार झाडे जळून खाक झाली होती. त्यामुळे आगी लागण्याच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात यावी.

**पालवण – पिंपळवंडी रस्त्याची दुरावस्था असुन तातडीने दुरुस्ती करण्यात यावी**

सह्याद्री देवराई हा हिरवळीने नटलेला परिसर असून येथे वळणदार घाट आणि शुद्ध ऑक्सिजन मिळत असल्याने बीड शहरातील नागरीक मॉर्निंग वॉक साठी मोठ्या प्रमाणामध्ये येत होते परंतु देवराईकडे जाणारा पालवण ते पिंपळवंडी पर्यंत रस्ता उघडल्याने या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांची संख्या रोडावली आहे. बीडच्या योगा ग्रुपने या ठिकाणी तीन वेळा मॅरेथॉन घेतली होती. या स्पर्धेला राज्यभरातून प्रतिसाद मिळाला परंतु खराब रस्ता असल्याने धावपटुंनी सुद्धा देवराई सध्या पाठ फिरवल्याचे पहायला मिळते. त्यामुळे तातडीने या रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी.

---

# लोकप्रतिनिधी यांच्या घराकडे जाणारा रस्ताच खड्डेमय नगरपरिषदेचे कायम दुर्लक्ष : मिलिंद सरपते

बीड । प्रतिनिधी



बीड शहरात खड्ड्यांनी रस्त्याची अक्षरश: चाळण झाली आहे, ज्यामुळे नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागतो. विशेषतः तहसील मागील आणि राष्ट्रवादी भवन ते लेंडी रस्ता भागातील रस्त्यांवर मोठे खड्डे पडल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे असे जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनात मिलिंद सरपते यांनी म्हटले आहे की या ठिकाणी निवासस्थान असलेले बीड आमदार संदीप क्षीरसागर यांचा रोजचा रस्ता असताना देखील त्याकडे ते जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत आणि नगरपालिकेचे मुख्याधिकारी नीता अंधारे कायम दुर्लक्ष करीत आहेत.

बीड शहरात येणाऱ्या जाणाऱ्या दुचाकी स्वरासह चार चाकी वाहनधारकांना सुद्धा या खड्ड्याचा अतोनात त्रास सहन करावा लागत आहे मोठी वाहने रस्त्यावरून जात असताना मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे व याचा त्रास पादचारी करणाऱ्या नागरिकांबरोबरच दूचाकी स्वरांनाही सहन करावा लागत आहे. रस्ता बघून गाडी चालवताना असं वाटतं की, नेमकं आपण रस्त्यावरून चाललोय की खड्ड्यातून चाललोय हेच कळत नाही माणसाला सुद्धा खड्डा चूकवता येत नाही एवढे खड्डे या रस्त्यावर पडले आहेत, अतिशय निकृष्ट दर्जाचे काम या रस्त्याचं झालेलं आहे, वारंवार या रस्त्याची मलमपट्टी करायची आणि आहे तसाच पहिल्यासारखा रस्ता होत आहे हे क्वालिटीचं काम झालेलं नाही, गाड्यांची तर एवढी बिकट अवस्था झालेली आहे की, गाडीवर जावं की चलत जावं असं झालंय लोकप्रतिनिधींना आमची अशी मागणी आहे की हा रस्ता एकदम क्वालिटी रस्ता झाला पाहिजे, असे दुचाकी स्वार म्हणत आहेत. त्यामुळे बीड शहरातील नागरिक संतप्त झाले आहेत. खड्डे बुजवण्याचे काम तात्काळ करा अथवा नवीन रस्ता बनवावा बीड शहरातील नागरिकांचा जीव वाचवावा. असे न झाल्यास त्या ठिकाणी अभिनव आंदोलन करण्याचा वंचितचे शहराचे नेते मिलिंद सरपते यांनी इशारा दिला आहे.

---

# श्री क्षेत्र भगवानगडाच्या दिंडीचे पैठणकडे प्रस्थान

भगवानगड । प्रतिनिधी

शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक साधुसंतांच्या दिंड्या पैठणला जातात. श्री क्षेत्र भगवानगड संस्थानची सुद्धा दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी नाथांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त दिंडी पैठणला जाणार आहे. या सोहळ्याला 'नाथषष्ठी' असे म्हणतात. या सोहळयासाठी भगवानगडाच्या भक्तमंडळींनी गडावर येऊन सोमवार दि.१७ मार्च रोजी दुपारी ठीक १ वाजता ह.भ.प.श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या अध्यक्षतेखाली दिंडी सोबत पैठणकडे प्रस्थान केले.



या दिंडी सोहळ्याचा पहिला मुक्काम राणेगावमध्ये, दुसरा मुक्काम प्रभूवाडगावमध्ये असून तिसऱ्या मुक्कामी दिंडी पैठणमध्ये पोहोचते. दिंडी सोहळ्या दरम्यान भगवानगडावरील युवा कीर्तनकार, सर्व साधकवर्ग व गडाचा संपूर्ण भक्तवर्ग मोठ्या आनंदामध्ये 'भानुदास एकनाथ' नामाचा गजर करत मार्गक्रमण करत आहे. वारीमध्ये चालताना पहाटे काकडा भजन, आंधळा, पांगळा, वासुदेव, गौळणी इत्यादी होतात. त्यानंतर दुपारचे अभंग गायले जातात. यामध्ये समाधीचे अभंग, पत्रिकेचे अभंग इत्यादींचा समावेश असतो. सायंकाळी ४ वाजता श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा हरिपाठ व शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांचा हरिपाठ होतो. हरिपाठानंतर सर्व वारकर्यांना नियोजित ग्रामस्थांतर्फे जेवणाची पंगत दिली जाते. रात्री ८ ते १० या वेळेमध्ये कीर्तनाचा कार्यक्रम असतो. कीर्तनानंतर जागर केला जातो. दिंडी पैठणमध्ये पोहोचल्यानंतर नाथवंशज दरवर्षी भगवानगडाच्या फडामध्ये येऊन भगवानगडाच्या दिंडीला नाथषष्ठी सोहळ्यामध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण देतात. श्री क्षेत्र भगवानगडाच्या फडामध्ये नाथांच्या समाधी सोहळ्याचा काला होईपर्यंत दररोज पहाटे काकडा भजन, दुपारचे भजन, दोन्ही हरिपाठ, हरिकीर्तन, हरीजागर इत्यादी सर्व धार्मिक नित्यनियम पार पाडले जातात.

---

# वाल्मिक कराड यांच्या आजही मर्जीतील पोलीस आजही बीड जिल्ह्यातच ठाण मांडून : तृप्ती देसाई

## वाल्मीक कराडच्या मर्जीतील पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्या विरोधातील पुरावे व गोपनीय माहिती पोलीस अधीक्षकांना तृप्ती देसाई यांनी दिली

बीड । प्रतिनिधी

वाल्मीक कराडच्या मर्जीतील २६ पोलीस अधिकाऱ्याची यादी, पुरावे तृप्ती देसाईकडे तयार. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवताना दिले. असून त्यांनी आज १७ मार्च रोजी त्यांना बीड पोलिसांनी संबंधित पुरावे घेऊन हजर राहण्यासाठी मोठी दिली होती त्या नोटीसी दरम्यान तृप्ती देसाई या बीडमध्ये आल्या होत्या त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की वाल्मीक करा व त्याची सक्रिय आहे वाल्मीकरांच्या मर्जीतील पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांची यादी व काही पुरावे ही पेन ड्राइव्ह मध्ये पोलीस अधीक्षक यांना देण्यात आलेले आहेत प्रसार माध्यमांना बोलताना सांगितले की काही गोपनीय माहितीही त्यांना दिलेली आहे त्यामुळे आता या प्रकरणाला काय ओळखतो व कोण पोलीस अधिकारी कर्मचारी हे बीड जिल्ह्याच्या बाहेरचा रस्ता बघतात याकडे जिल्ह्याचे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे

सरपंच स्व.सतोष देशमुख निर्घृण हत्या करण्यात आल्याने बीड जिल्हा सह महाराष्ट्र हादरला होता. खंडणी व हत्या प्रकरणी आरोपी असलेले वाल्मीक कराड यांच्या मर्जीतील काही पोलीस अधिकारी बीड पोलीस दलात असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केला आहे. त्यामुळे त्यांना पोलीस अधीक्षक यांनी पुरावे सादर करण्यासाठी आज पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलवण्यात आले होते.



वाल्मीक कराड यांच्या मर्जीतील पोलीस कर्मचारी असल्याचा आरोप केल्याने, तृप्ती देसाई यांना आज बीड पोलिसांनी पुरावे सादर करण्यासाठी आज बीड पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलण्यात आले होते. वाल्मीक कराडला मदत करणारे, पाठीशी घालणारे पोलीस कर्मचारी व पोलीस अधिकाऱ्याची यादी घेऊन आल्या असता तपासी अधिकारी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांची भेट होऊ शकली नाही.

अप्पर पोलीस अधीक्षक यांना तपासासाठी एका गंभीर प्रकरणात तात्काळ जावे लागले मात्र यावेळी तृप्त देसाई यांना राग अनावर झाला होता.वाल्मीक कराडच्या मर्जीतील २६ पोलीस अधिकाऱ्याची यादी घेऊन पोलीस अधीक्षक कार्यालयात दाखल झाल्या लोकप्रतिनिधींनी ज्या अधिकाऱ्यांची नावे घेतली यामध्ये सचिन पांडकर यांचेही नाव असल्याचे त्यांनी म्हटले आहे. बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गुंडशाही वाढली आहे व वाल्मीक कराड यांच्या संबंधित असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची यादी व पुरावे घेण्यास कोणीही पुढे येत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. तर आज बीड पोलीस अधीक्षक कार्यालय या ठिकाणी उपस्थित राहून संबंधित पुरावे व गोपनीय माहिती ही पोलिस अधीक्षक यांना देण्यात आलेली आहे व पुढीलपैकी स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या निवासस्थानी मासाजोग या ठिकाणी भेट देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**तृप्ती देसाई उपस्थित केलेले प्रश्न?**

- जे २६ पोलीस अधिकारी वाल्मीक कराड यांच्या संपर्कात आहेत..
- काही कर्मचारी दहा वर्ष एकाच पोलीस ठाण्यात आहेत..
- तसेच काहीजण हप्ते गोळा करतात...
- याचे पुरावे पेन ड्राईव्ह मध्ये आणले आहे..
- ज्या अधिकाऱ्यांना हे दाखवायचं आहे ते अधिकारी या ठिकाणी हजर नाहीत...
- त्यांना मात्र याचे गांभीर्य नाही..
- पोलीस अधिकारी वाल्मीक कराड याच्या कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत आहे...
- तातडीने त्यांची बदली केली पाहिजे..
- अशी आमची मागणी आहे..
- मुख्यमंत्री गृहमंत्री पालकमंत्री यांना मागणी आहे
- आता अधिवेशन चालू आहे तोपर्यंत यांना जिल्ह्यातून बाहेर काढून निलंबित करा
- तरच बीड मधील गुंडाराज रोखू शकतो
- जे चुकीचे पोलीस अधिकारी आहेत. त्यांना पाठीशी घालणारे अधिकाऱ्यांना बाहेरचा रस्ता दाखवला पाहिजे..
- तरच हे थांबले जाईल
- त्यामुळे तातडीने यावर कारवाई केली पाहिजे
- याची गोपनीय चौकशी करा
- आम्ही सर्व पुरावे व्यवस्थित आणले आहेत
- नवनीत कावत पोलीस अधीक्षक आले तेव्हापासून काम चांगलं चालू आहे
- मात्र इतर जुने अधिकारी वाल्मीक कराड यांच्या टोळीशी संपर्कात आहेत
- त्यांना पाठीशी घालण्याचे काम सुरू आहे
- धनंजय मुंडे पालकमंत्री नसले तरी राष्ट्रवादी पक्षाकडेच पालकमंत्री पद आहे
- अजितदादा मात्र या ठिकाणी दिसत नाहीत
- दररोज एक घटना बाहेर येत आहे मात्र त्यावर अजितदादा काहीच बोलत नाही
- आष्टीची घटना खोक्याची घटना अनेक घटना पुढे आले आहेत
- वेगवेगळ्या लोकप्रतिनिधींचे लोक मारण करत आहेत
- इथला गुंडाराज थांबवता येत नसेल तर अधिवेशनात निर्णय होणे गरजेचे आहे
- राज्याचे मुख्यमंत्री चांगल्या पद्धतीने काम करत आहे
- मात्र गृहमंत्री निभवताना बऱ्याच गोष्टी पाठीशी घालण्याचा प्रयत्न सुरू आहे
- गृहमंत्री कुठेतरी कमी पडत आहेत
- अधिवेशनात प्रकरण गाजले पाहिजे असं वाटलं होतं मात्र यावर कुठलीही कारवाई झालेली नाही
- देवेंद्र फडणवीस यांच्यावर घटक पक्षाचा दबाव आहे
- त्यामुळेच धनंजय मुंडे यांचा राजीनामा झाला नव्हता
- वातावरण दूषित झाले आहे कोणीही याबाबत गंभीर नाही
- पुरावे घेऊन आलो आहोत मात्र ते या ठिकाणी उपस्थित नाही
- सचिन पांडकर यांचे देखील यादीमध्ये नाव आहे
- आम्ही जबाब देण्यासाठी आलो आहोत मात्र तुम्ही काहीच करत नाहीत
- कृष्णा आंधळे फरार पोलिसांची चूक आहे
- जी २६ पोलीस कर्मचारी आहेत त्यात बीट प्रमुख आरोपींना पळून जाण्यास मदत करत होता
- त्यात बीट प्रमुखाला निलंबित देखील केले नाही
- त्यामुळे अधिकाऱ्यांना कधी निलंबित करण्यात
- धनंजय मुंडे अजित दादा या सर्वांची गुंडागर्दी चाललेली आहे त्याला पाठीशी घालण्याचे काम सुरू आहे.

# सिमेंट बाकड्यांमुळे ऐतिहासिक कारंजा टॉवरची शोभा वाढली

## जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, पोलीस अधीक्षक, तहसीलदार यांनीही मनसोक्त आनंद घ्यावा

बीड । प्रतिनिधी

ऐतिहासिक कारंजा टॉवर लगत ठेवण्यात आलेल्या सात सिमेंट बाकड्यांमुळे या ऐतिहासिक वास्तूची शोभा वाढली आहे. इथे जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, पोलीस अधीक्षक आणि तहसीलदार यांनीही येऊन बसत मनसोक्त आनंद घ्यावा असे आवाहन कारंजा टॉवर चे परिपूर्ण नूतनीकरण करण्यात यावे ही मागणी करणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे, तालेब पटेल, मिर्झा अब्दुल रऊफ़ बेग, फारुख शेख आदींनी केले आहे.

ऐतिहासिक कारंजा टॉवरचे नूतनीकरण २०14 साली सुरू करण्यात आले होते. १० वर्ष उलटूनही अद्याप नूतनीकरण परिपूर्ण करण्यात आलेले नाही. फक्त इमारतीला आतून बाहेरून प्लास्टर करून सोडून देण्यात आले आहे. रंगरंगोटी केली नाही. इमारती समोर बनविलेल्या हौदातील पाण्याचे फवारे सुरू केले नाही. जिल्हा प्रशासनाची अनास्था आणि बीड नगर परिषदेचा हलगर्जीपणा यामुळे या ऐतिहासिक इमारतीची देखरेख करण्यासाठी एखादा सरकारी कर्मचारीही नियुक्त केलेला नाही. प्रशासनिक स्तरावरील अशा प्रकारची अनास्था आणि हलगर्जीपणामुळे बघता–बघता कारंजा टॉवर ची दुर्दशा झाली. या इमारतीच्या तिन्ही बाजूंनी अस्ताव्यस्त गाड्या लावण्यात येतात. इमारतीच्या भिंतींवर पोस्टर चिटकविण्यात येतात. मोठमोठाले अगडबंब डिजिटल बॅनर लावले जातात. काही नतद्रष्ट, बिनडोक आणि नालायक लोक टॉवर समोर मोठ्या प्रमाणात कचरा आणून टाकतात. यामुळे या ऐतिहासिक इमारतीची पार रया गेली आहे. या इमारतीला पूर्व वैभव प्राप्त व्हावे, कारंजा टॉवर पूर्वीसारखे दैदीप्यमान रुबाबदार आणि आकर्षक दिसावे. याकरिता गेल्या



१० वर्षांपासून जिल्हा प्रशासनासह बीड नगर परिषदेकडे अनेकदा निवेदने देण्यात आलेली आहेत. शिवाय प्रसिद्धी माध्यमातून बातम्या आणि लेख सुद्धा प्रकाशित झालेले आहेत. तरीही निगरगट्ट गेंड्याच्या कातडीचे झालेले जिल्हा प्रशासन आणि बीड नगर परिषदेवर याचा कुठला ही परिणाम होत नसल्याने आता कारंजा परिसर, अज़ीज़पुरा आणि खंदक येथील नागरिकांनी मिळून कारंजा टॉवर चा चेहरा मोहरा चांगला करण्याकरिता पुढाकार घेतला आहे. यातूनच कारंजा टॉवर लगत सिमेंटचे सात बाकडे ठेवण्यात आले आहे. या बाकड्यांवर बाल गोपाळांपासून ज्येष्ठ आणि वयोवृद्ध नागरिक बसत असल्याने कारंजा टॉवरची शोभा वाढली आहे. यामुळे बसणाऱ्यांसह बघणाऱ्यांनाही आनंद होत आहे. आता बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे, बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत आणि बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी येथे जातीने येऊन बसत मनसोक्त आनंद घ्यावा तसेच कारंजा टॉवरची आतून बाहेरून सर्व पाहणी करत नूतनीकरणाचे अपूर्ण असलेले कार्य पूर्ण करण्याचे कार्य हाती घ्यावे.

यात टॉवरचे तुटलेले दार बदलून नवीन लावणे, बंद पडलेल्या घड्याळी सुरू करणे, इमारतीला आतून बाहेरून रंगरंगोटी करणे, इमारतीवर चारही बाजूने प्रकाश टाकणारे हाय मास्ट दिवे लावणे, जवळील दोन्ही झाडांच्या इमारतीला चिटकलेल्या फांद्या छाटणे, पाण्याच्या फवाऱ्यासाठी बनविलेल्या हौदात विद्यूत मोटर बसवून पाण्याचे फवारे सुरू करणे, पाण्याच्या फवाऱ्यांसाठी रंगबिरंगी विद्युत रोषणाईचे दिवे लावणे, इमारती समोर तसेच या परिसरात डिजिटल होल्डिंग लावण्यास कायमस्वरूपी कडक बंदी घालणे, कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक प्रतिबंधित सक्तीच्या कारवाया करणे, इमारतीच्या पश्चिम आणि उत्तर बाजूच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे, कॉंक्रिटीकरण झाल्यावर पश्चिम व उत्तर बाजूस दक्षिण बाजू सारखे सिमेंटचे बाकडे ठेवणे, टॉवरची देखभाल आणि सुरक्षेकरिता बीड नगर परिषदेचा प्रत्येकी किमान एक–एक कर्मचारी दिवस–रात्र कायमस्वरूपी नियुक्त करणे इत्यादी कामे युद्ध पातळीवर करण्यासाठी प्रशासनाने आता मृतावस्थेतून जागे व्हावे आणि ही सर्व कामे करावीत असे आवाहनही एस.एम.युसूफ़, रमेशराव गंगाधरे, तालेब पटेल, मिर्झा अब्दुल रऊफ़ बेग, फारुक शेख आदींनी केले आहे.

# सांसे हो रही है कम, आओ पेड लगाये हम..!

गेवराई । प्रतिनिधी

सुरुवातीपासूनच झाडांनी मनुष्याला जीवन जगण्यासाठी ऑक्सिजन देण्याचे काम केले आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये झाडांचे महत्त्व खूप मोठे आहे. झाडे लावा झाडे जगवा म्हणत फक्त झाडे लावून चालणार नाही तर ती जगवली देखील पाहिजेत.त्यामुळे वृक्षारोपण व त्याचबरोबर वृक्ष संवर्धन ही काळाची गरज असून वृक्ष संवर्धनाचे महत्त्व नागरीकांना पेटवून देण्यासाठी गेवराईतील सामाजिक कार्यकर्ते संदीप साळवे यांनी वृक्ष संवर्धन मोहीम हाती घेतली आहे. त्यांनी शहर व परिसरामध्ये हजारो झाडे लावून त्यांचे संवर्धन करत एक आदर्श निर्माण केला आहे.



गेवराई येथील सामाजिक कार्यकर्ते संदीप साळवे हे गेवराईतील रायगड प्रतिष्ठान, व मांगिरबाबा वृक्ष लागवड समितीचे सदस्य असून सह्याद्री देवराई वृक्ष लागवड प्रकल्प या ठिकाणी अभिनेते सयाजी शिंदे यांच्यासोबत देखील संदीप साळवे यांनी वृक्ष संवर्धनाचे काम केले आहे. गेल्या १० वर्षांपासून वृक्ष संवर्धन चळवळीमध्ये ते काम करत आहेत. त्यांनी शहरात शेकडो झाडे लावून त्यांचे संवर्धन देखील केले आहे. गेवराई व परिसरात कुठेही वृक्षारोपण मोहीम असेल त्या ठिकाणी ते जाऊन संदीप हे स्वयं स्फूर्तीने वृक्षारोपणाचे काम करतात. फक्त झाडे लावून चालणार नाहीत तर त्याचे संवर्धन देखील केले पाहिजे असा संदेश देत वृक्ष संवर्धनाचे महत्त्व पटवून देण्याचे कार्य संदीप साळवे यांच्या माध्यमातून केले जात आहे. याविषयी बोलताना संदीप साळवे म्हणाले की वृक्ष संवर्धन ही काळाची गरज असून प्रत्येकाच्या आयुष्यात झाडाचे खूप मोठे महत्त्व आहे. हे महत्त्व लक्षात घेऊन प्रत्येक व्यक्तीने एक झाड लावून त्या झाडाचे संवर्धन केले पाहिजे. फक्त झाडे लावा झाडे जगवा म्हणून झाडे लावायची व नंतर त्याकडे दुर्लक्ष करायचे असे होता कामा नये त्यामुळे प्रत्येकाने एक का होईना झाड लावले पाहिजे व त्याला नियमितपणे पाणी घालून त्याची निगा राखून ते जगवले पाहिजे तरच वृक्ष संवर्धन चळवळ अधिक बळकट होईल. त्यासाठी तरुणांनी पुढे आले पाहिजे व वृक्ष संवर्धन चळवळीमध्ये सहभागी झाले पाहिजे असं मत त्यांनी व्यक्त केले. गेवराई शहर परिसरात झाडे लावून त्या झाडांचे संवर्धन करण्याचे काम संदीप साळवे व त्यांच्या मित्र परिवाराच्या माध्यमातून होत असून त्यांच्या वृक्षारोपण व वृक्ष संगोपणाच्या कार्याला मित्रांची मोठी मदत होत असल्याचे सांगत ते मित्रपरिवारा विषयी कृतज्ञता व्यक्त करतात. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे कुठलाही गाजावाजा न करता त्यांचे वृक्षारोपण व वृक्ष संगोपणाचे कार्य मागील १० वर्षांपासून सूरू आहे. तसेच सामाजिक कार्यात देखील संदीप साळवे हे सदैव अग्रेसर असतात त्यांच्या या कार्याचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.



# क्रांतीनगर भागात पाणीपुरवठ्याविषयी सीईओ अजित धोपे यांची पाहणी

केज । प्रतिनिधी

केज शहरातील क्रांतीनगर भागामध्ये सहा ते सात गल्ल्यांमध्ये गेल्या आठ–नऊ महिन्यापासून पाणीपुरवठा खंडित आहे. यासंदर्भात लोकांच्या तक्रारी लक्षात घेऊन आज पाणीपुरवठा विभागाचे सीईओ अजित धोपे साहेब तसेच इंजिनिअर जगदीश हिंबाडे यांनी पाहणी केली. केज शहरासाठी धनेगाव येथुन पाणीपुरवठा केला जात असुन काही भागामध्ये भर उन्हाळ्यात पाणी नियमित येत नसल्या कारणामुळे लोकांचे हाल होत आहेत.

फुटलेली पाईपलाईन त्वरीत दुरुस्त करण्याचे आदेश सी ई ओ साहेबांनी स्थानिक कर्मचारी भीमा गालफाडे व त्यांच्या सहकाऱ्यांना दिलेले आहेत. त्यानुसार येणाऱ्या आठ दिवसात क्रांति नगर भागातील ठिकठिकाणचे वॉल दुरुस्त करुन तसेच फुटलेली पाईप लाईन दुरुस्त करुन येथील नागरीकांना सुरळीत पाणीपुरवठा केला जाईल असे आश्वासन देण्यात आले.

# महाराष्ट्र विशेष जण सुरक्षा विधेयक म्हणजे लोकशाही व संविधानाची गळचेपी : संदेश आंबेडकर

बीड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित संविधानावर, त्यांनी दिलेल्या लोकशाही वर घाला घालण्याचे काम कॉंग्रेस सह आता भाजपा सरकार सातत्याने करत आले आहे. या घटनेचा जाहीर आणी कठोर शब्दात निषेध व्यक्त करत असल्याचे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया सविधान पक्षाचे सुप्रिमो मा. संदेश आंबेडकर म्हणाले.

संदेश आंबेडकर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोठे पंतु असून ते पुढे म्हणाले कि, संविधान बदलण्यासाठी.., लोकशाही पायमल्ली सातत्याने महाराष्ट्र राज्यात सातत्याने केली जात आहे. संविधान विरोधी कारवायाना जोर आलेला आहे. संविधानाच्या मूळ तरतुदी म्हणजेच आर्टिकलं १४, १९ व २१ या मूलभूत



अधिकारावर समता, स्वतंत्रता आणि जीवन जगण्याचा अधिकार या अधिकारावरच घाला घालण्याचे काम हे सरकार जाणीवपूर्वक करत आहे.

महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक लोकांच्या अधीकार व हक्कावर गदा आणणारा कायदा होय. हा कायदा अंमलात आल्यास लोकशाही संपवून संविधानावर फार मोठा घाला घातला जाणार आहे. एकंदरीत संविधानच बदलण्याची प्रक्रिया या सत्ताधारी सरकारने चालवली आहे असे म्हणणे नाकारता येणार नाही.

शासन नवीन कायदा आणू पाहत आहे त्यावर सरकारच्या विरोधात आंदोलन करता येणे अशक्य राहणार आहे. नवीन आणलेल्या कायद्या अंतर्गत सेकशन २, ५ आणि ८ अंतर्गत सरकारच्या विरोधात आंदोलन कराल, सरकारच्या विरोधात लीखान कराल. सरकारच्या ऊनिवा स्पस्ट कराल. सरकारच्या धोरणनावर टीका कराल, त्यासाठी रस्त्यावर उतराल किंवा आंदोलन कराल. तर या सर्व गोष्टी बेकायदेशीर ठरवून सरकार तुम्हाला अर्बन नक्षली ठरवून सरकार तुमच्या विरुद्ध कठोर कारवाई करेल. शिवाय सरकार तुम्हाला न सांगता अटक करुन बेल नाकारेल व २ ते ७ वर्षाचा तुरुंगावस आणि २ ते तीन लाखाचा दंड सुध्दा ठोठावेल.

या सरकारच्या विरोधात बोलता येणार नाही. लोकशाही धोक्यात आहे. संविधान धोक्यात आहे. त्यामुळे या विधेयकाचा विरोध करणे अत्यंत गरजेचे आहे. यामुळे सर्व जाती धर्माच्या संस्था व संघटनानी मिळून या विधेयकाचा विरोध करावा. असे आवाहन संदेश आंबेडकर यांनी व्यक्त केले... तसेच प्रसंगी रस्त्यावर उतरावे लागले तर उतरण्याचे आदेश दिल्यास महाराष्ट्र भर आंदोलन करू असे मत पक्षाचे संस्थापक महासचिव डॉ. राजन माकणीकर यांनी व्यक्त केले.



# आदर्श आवरगाव येथील शुद्ध शाकाहारी धुरवडीची ११ वर्षापासूनची परंपरा कायम

धारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील आदर्श असणाऱ्या आवरगाव येथे गेली अकरा वर्षांपासून शुद्ध शाकाहारी धुरवडीचा आदर्श उपक्रम राबवला जात आहे. ही धुरवड तालुक्यात जिल्ह्यासह राज्यात आदर्श आहे व अशी धुरवड साजरी केली जावी असे समस्त आवरगावकरांचे म्हणणे आहे, आदर्श गावच्या आदर्श धुरवडीचे सर्वत्र कौतुक होत आहे. या धुरवडीत खिचडी, भजे, पापड, जामुन, जिलेबी असे अनेक शुद्ध शाकाहारी पदार्थ बनवले जातात. त्यासोबतच विविध प्रकारची फळे खाऊन ही धुरवड शुद्ध शाकाहारी पद्धतीने साजरी केली जात आहे.

मागील ११ वर्षापासुन आखंड चालु असलेल्या या व्यसनमुक्त शुद्ध शाकाहारी चरित्रवान समाज निर्माण करण्याच्या उद्देशातून हा नाविन्यपूर्ण उपक्रम आदर्श ग्रा.प.आवरगाव येथे राबवला जात आहे असाच उपक्रम सर्व गावागावात राबवावा, असे मत आवरगावचे आदर्श सरपंच अमोल जगताप यांचे म्हणणे आहे.

# श्री बंकटस्वामी महाविद्यालयात संत साहित्यामध्ये संत तुकाराम महाराजांचे योगदान या विषयावर व्याख्यान

बीड । प्रतिनिधी

दिनांक १७ मार्च २०२५ रोजी येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने संत तुकाराम महाराज यांचे संत साहित्यातील योगदान या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून मराठी विभागाचे प्राध्यापक नितीन चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे यांचीही उपस्थिती होती.

प्रमुख वक्ते प्रा.नितीन चव्हाण यांनी संत तुकाराम महाराजांचे जनसामान्यांबद्दलचे विचार स्पष्ट करताना त्यांच्या अभंगांमधून विषमता, अज्ञान, अंधश्रद्धा, दैववाद, कर्मवाद आणि दारिद्र्य यांसारख्या सामाजिक समस्यांवर कसे भाष्य केले आहे, हे सांगितले. बुडती हे जन न




देखवे डोळा, येतो कळवळा म्हनोनी या अभंगाच्या संदर्भाने त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या समाजहिताच्या भूमिकेवर प्रकाश टाकला.संत तुकाराम महाराजांनी शिक्षण, वाचन, चिंतन, अभ्यास आणि गुरु–शिष्य परंपरेबाबत मांडलेले विचारही या व्याख्यानात मांडण्यात आले. समाजाने विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन ठेवावा आणि अंधश्रद्धा नष्ट व्हाव्यात, यासाठी संत तुकाराम महाराजांनी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख त्यांनी केला. तसेच, वाणिज्य, व्यापार, शेती आणि सावकारी यासंबंधीचे त्यांचे अनुभव आणि त्यातून त्यांनी समाजाला दिलेली दिशा यावरही त्यांनी सविस्तर विवेचन केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे यांनी मराठी विभागाच्या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, ज्या संताच्या नावाने हे महाविद्यालय उभे आहे, त्या संतांच्या विचारांचा प्रसार हा या उपक्रमाच्या माध्यमातून होत आहे.

तुकाराम गाथा हा जगातील एकमेव असा ग्रंथ आहे, ज्याची आजही चांदीच्या पालखीतून मिरवणूक निघते. ही गाथा प्रत्येकाने वाचावी, आत्मसात करावी आणि त्यानुसार आपले जीवन मार्गी लावावे, असे याप्रसंगी मत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे प्रा. डॉ. महादेव जगताप यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राजू काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कनिष्ठ विभागाचे प्राध्यापक प्रा. राजाभाऊ नागरगोजे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ’च्या दणक्याने न.प.च्या बांधकाम विभागाला आली जाग!

## गेवराई शहरातील सावता नगर येथील रस्त्याच्या कामाला अखेर सुरूवात




गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील सावता नगर येथील रस्त्याची अत्यंत दुरवस्था झालेली होती. गेल्या अनेक वर्षांपासून याकडे दुर्लक्ष होताना दिसत होते. यामुळे स्थानिक नागरिक त्रस्त होते. दैनिक महाराष्ट्र‘आरभ’ने या समस्येची दखल घेतली आणि बातमी प्रकाशित होताच रस्त्याचे काम गेवराई नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाकडून तत्काळ सुरू करण्यात आले आहे. शहराच्या विकासासाठी मोठ-मोठे स्वप्न दाखवीत स्वतःचीच पाठ थोपटून घेतली जात होती मात्र प्रत्यक्षात सावता नगर येथील रस्त्यांची अत्यंत दुरावस्था होती. रस्ता हा कच्चा व अत्यंत खराब असल्यामुळे सातत्याने तेथील स्थानिक नागरिकांना याचा फार त्रास सहन करावा लागत होता. स्थानिकच्या नागरिकांच्या समस्यांची दखल घेत दैनिक महाराष्ट्र ’आरंभ’ ने बातमी प्रकाशित केली होती. सदरील बातमीची दखल घेत नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाकडून रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

रस्ता खराब असल्यामुळे स्थानिक नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले होते. रस्त्याची अत्यंत दुरावस्था असल्याने नागरिकांना रोजच्या जीवनात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. तसेच वाहनांना अडथळा निर्माण होत होता. तसेच पाणी साचून चिखल झाल्यामुळे नागरिकांच्या समस्यांत आणखी भर पडली होती.

या परिस्थितीची तक्रार अनेक वेळा संबंधित नगरपरिषद तसेच माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्याकडे करण्यात आली होती. परंतु त्यावर कोणतीच कारवाई होत नव्हती. अखेर दैनिक महाराष्ट्र‘आरंभ’ने स्थानिक नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत बातमी प्रकाशित केल्यानंतर प्रशासनाने त्वरीत पाऊल उचलले आणि रस्त्याचे काम सुरू केले. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे. सावता नगर या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या खड्डयांमुळे रस्त्याची मोठी दुरवस्था झाली आहे. या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांनी केली होती. याबाबत दैनिक महाराष्ट्र ‘आरंभ’ने बातमी प्रकाशित केली होती. या बातमीची दखल घेऊन संबंधित विभागाने तातडीने रस्त्याचे काम सुरू केले आहे. बातमीची दखल घेत नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाने संबंधित रस्त्याचे काम हाती घेतले आहे. सध्या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली असून, स्थानिकच्या नागरिकांकडून समाधान व्यक्त केले आहे.

### बातमी प्रकाशित होताच इंजिनियर चाळक यांनी घातले तातडीने लक्ष!

सायं दैनिक महाराष्ट्र आरंभच्या वृत्तपत्राच्या माध्यमातून रस्त्याच्या कामासंदर्भात एक बातमी प्रकाशित करण्यात आली होती. याचीच दखल घेऊन इंजिनिअर चाळक यांनी तात्काळ लक्ष घातले आणि कामाला सुरुवात केली आहे. या रस्त्यांच्या कामात एका रस्त्यांचे काम हे इस्टिमेंट कमी आहे असे कारण दाखवून अपूर्ण ठेवले आहे. त्यामुळें स्थानिक नागरिकांची गैरसोय होऊ शकते, म्हणून पुढील इस्टिमेंट मध्ये ते काम पावसाळ्याच्या आधीच करावे अशी मागणी होत आहे.

# गेवराईच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये औषधांचा तुटवडा

## खाजगी मेडिकल वाल्यांनी रुग्णांची लूट करू नये : शेखर भुंबे

गेवराई । प्रतिनिधी

गोरगरिबांचा आधार असलेल्या गेवराई उपजिल्हा रुग्णालयात (सिव्हिल) औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे. रुग्णांच्या जखमेवर ड्रेसिंग करायचे साहित्य नाही. मधुमेह, रक्तदाबावरील गोळ्यांचा नेहमीच खडखडाट असतो. रुग्णांच्या नातेवाईकांना सर्रासपणे बाहेरून औषधे खरेदीसाठी चिठ्ठी दिली जात आहे. खाजगी मेडिकल वाल्याकडून रुग्णांची मोठ्या प्रमाणात लुट होत आहे त्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांचे सध्या हाल सुरू आहेत.

येथील रुग्णालयात अत्यंत अवघड शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली जात नाही यासाठी कोट्यवधी रुपयांची निधी शासनाने मंजूर केला. रुग्णालयाची टोलेजंग इमारत उभा राहिली. मात्र शासनाने औषध खरेदीसाठी निधीच वाढवून दिलेला नाही. गेल्या कित्येक वर्षापासून औषध खरेदीसाठी वर्षाला अल्पावधीत रुपयांचा निधी दिला जात आहे. दररोज रुग्ण बाह्यरुग्ण विभागात उपचारासाठी दाखल होतात. रुग्णांना वार्डात दाखल करून उपचार केले जातात.

रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे प्रशासनाला सातत्याने औषध टंचाईचा सामना करावा लागत आहे. शासनाने रुग्णालयात औषध दुकान सुरू केले. मात्र गोरगरीब रुग्णांना औषधे मिळावीत, यासाठी निधी वाढवून देण्यासाठी कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाही. खासगी रुग्णालात जाऊन उपचार करण्यासाठी ऐपत नसल्याने रुग्ण ’सिव्हिल’मध्ये दाखल होतात. महागड्या तपासण्या करण्याची सामुग्री नाही. सीटीस्कॅन आणि एमआरआय तपासणीला एकतर मिरजेला नाही तर खासगी रुग्णालयात रुग्णांना जावावे लागत आहे. औषध टंचाईमुळे रुग्णांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. डॉक्टरांकडून रुग्णांच्या नातेवाईकांना सर्रासपणे औषधे बाहेरून खरेदी करण्यासाठी चिठ्ठी जात आहे. पण खाजगी मेडिकल वाले याचाच फायदा घेऊन रुग्णांची लूट केली जाते ही थांबवली पाहिजे सातत्याने अपघातातील जखमी रुग्ण दाखल होतात. त्यांच्या जखमेवर ड्रेसिंग करण्यासाठी साहित्य नाही. तेही बाहेर आणायला सांगितले जात आहे. मधुमेह, रक्तदाबावरील गोळ्या नाहीत. अनेक आजारातील महागडी औषधे असल्याने रुग्णांचे प्रचंड हाल सुरू आहेत. म्हणून खाजगी मेडिकल वाले याचा फायदा घेऊन रुग्णांना लुटवण्याचा कारभार मोठ्या प्रमाणात करत आहेत जिल्हाधिकारी महोदयांनी ही लूट थांबवावी व उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना औषधे मिळून द्यावेत अन्यथा स्टाईलने आंदोलन करू, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे युवा नेते शेखर भुंबे यांनी केले आहे.




# सीबीआयच्या नोटीसच्या भितीने कल्याण आबुज यांची प्रकाश सोळंकेंकडे धाव ?

## कल्याण आबुज यांनी कॅनरा बँकेच्या संगनमताने उचलले ३९ कोटी ७० लाख रुपये

माजलगांव । प्रतिनिधी

कल्याण आबुज सीबीआयच्या नोटीसच्या भीतीमुळे प्रकाश सोळंके धाव घेतलेली आहे. कारण कल्याण आबुज यांनी कॅनरा बँकेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने खानापूर येथील प्लॉट व बांधकामावर ३९ कोटी ७० लाख रुपये उचलले.पीटीआर नुसार ४००० स्के.फु.एवढे प्लॉट क्षेत्र असून हे ग्रामपंचायत खानापूर हद्दीत येते आणि येथे प्लॉट चा भाव कमी आहे.त्यामुळे येथे जर मुख्य माजलगांव शहरातील जरी भाव लावला तरी एवढी रक्कम होत नाही. तरी पण कॅनरा बँकेच्या अधिकारी यांच्या संगनमताने ३९ कोटी ७० लाख रुपये एवढी कर्ज रक्कम कल्याण आबुज यांनी उचलली आहे. ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या संपत्तीचे मुल्यांकन एवढे नसताना हि रक्कम कशी अदा केली?

त्यांच्या पीटीआर वर बोजा पण चढवण्यात आला आहे मग या संपत्ती ची एवढी रक्कम नसताना त्यांना एवढे कर्ज कसे अदा केले असा सवाल जनता करत आहे.

त्यामुळे याविरोधात सीबीआय कडे तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. या तक्रारीची दखल घेत बॅकेला नोटीस बजावली आहे . याच नोटीस च्या भितीने कल्याण आबुज यांनी विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्याकडे धाव घेतलेली आहे. विधानसभा निवडणुकीत निर्मळ यांना पाठिंबा देत आबुज यांनी प्रकाश सोळंके यांच्याविरोधात काम केले परंतु प्रकाश सोळंके यांनी परत त्यांना आपल्या पक्षात सामावून घेतले. सीबीआय ने बजावलेल्या नोटिस मुळे कल्याण आबुज यांचे धाबे दणाणले आहेत तर अजून काय काय काळे कामं केलेली ती सगळी बाहेर येण्याच्या मार्गावर दिसून येत आहे. आबुज हे अडचणीत आलेले असताना त्यांच्यावर कारवाई करावी यावी अशी मागणी तक्रारदारांकडून करण्यात येत आहे.





### प्रकाश सोळंके यांनी कल्याण आबुज यांची पाठराखण करू नये सामान्य जनतेची मागणी

माजलगांव तालुक्यातील जनतेला नेहमीचं प्रकाश सोळंके यांनी वेडयात काढण्याचे काम केले आहे आणि कल्याण आबुज यांच्यावर रोष असताना देखील त्यांना पक्षात स्थान दिल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजी दिसून येत आहे. कल्याण आबुज सारख्या भ्रष्टाचारी माणसाला प्रकाश सोळंके हे का जवळ करत आहेत असा सवाल सामान्य जनतेने उपस्थित केला आहे. या भ्रष्टाचारा मध्ये प्रकाश सोळंके यांचा देखील काही हात आहे का असा संशय जनतेतून व्यक्त केला जात आहे.प्रकाश सोळंके यांनी कल्याण आबुज यांची पाठराखण करू नये अशी मागणी सामान्य जनतेने केली आहे.

# केज शहर घातक युटर्न च्या घेऱ्यात

केज । प्रतिनिधी

केज शहरात अंबेजोगाई- मांजरसुंभा महामार्गावर पिसाटी नदी पूल ते मधूबन हॉटेल पर्यंतच्या रस्ता दुभाजकावर असलेले यूटर्न सिमेंटने भरले नसल्याने या यू टर्न वर धोकेदायक कटाव निर्माण झाल्याने दुचाकी व इतर छोटी वाहने वळण घेताना अपघातग्रस्त होत आहेत. विद्यार्थी, महिलांना अशा यू टर्न वरून रस्ता पार करताना त्रास होत आहे.



हे कटाव तात्काळ भरण्याबद्दल एच पी एम कंपनीला केज विकास संघर्ष समितीने तोंडी व लेखी विनंती केलेली आहे.

जर कंपनीने येत्या दोन दिवसात हे सर्व कटाव भरून घेतले नाहीत तर येत्या गुरुवार दि. २० मार्च रोजी केज विकास संघर्ष समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ बेमुदत रस्तारोको आंदोलन करण्यात येणार आहे. समिती याबाबतची अत्यावश्यक निवेदने कंपनी सह केजचे तहसिलदार यांनाही देत आहे. तरी कंपनीने या महामार्गावरील सर्व यूटर्न वरील कटाव सिमेंटने भरून घ्यावेत अशी मागणी समितीने केली आहे. निवेदनावर समन्वयक हनुमंत भोसले, नासेर मुंडे, शेषराव घोरपडे यांच्यासह नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.


# केज तालुक्यात रमेश आडसकर गटाला खिंडार!

## खा.सोनवणे यांच्या उपस्थितीत आडसकर यांच्या खंदे समर्थकांचा प्रवेश

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील वरपगाव येथील रमेश आडसकर यांचे खंदे समर्थक २० वर्ष सेवा सहकारी सोसायटीचे मा. चेअरमन राहीलेले अंकुश नाना देशमुख व व्हाइस. चेअरमन अंबरभाई शेख यांनी अँड. बाबुराव देशमुख ययांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्याचे खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे केज तालुक्यात आडसकर गटाला खिंडार पडताना दिसत आहे.

अनेक वर्षे आडसकर गटासोबत काम करणारे कार्यकर्ते रमेशराव आडसकर यांना सोडुन जाताना दिसत आहेत. कारण आडसकर यांनी चिंचोली माळी जिल्हा परिषद अनेक वर्षे चालवली परंतु कवडीचा विकास त्यांना करता आला परंतु खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी पाच वर्षे चिंचोली माळी जिल्हा परिषदेवर काम केले पन भरघोस विकास निधी चिंचोली माळी जिल्हा परिषद सर्कल मध्ये दिला व आडसकर यांनी २५ वर्षात जो विकास चिंचोली माळी जिल्हा परिषद सर्कल मध्ये केला नाही. त्यापेक्षा दुप्पट विकास खासदार बजरंग बप्पा सोनवणे चिंचोली माळी जिल्हा परिषद सर्कल मधुन निवडुन आल्यानंतर पाच वर्षांत केला आहे. त्यामुळे रमेश आडसकर यांच्या वर चिंचोली माळी सर्कल मधील जनता नाराज होऊन आज रमेश आडसकर यांचे खंदे समर्थक सुध्दा रमेश आडसकर यांना सोडुन जाताना दिसत आहेत त्यांचाच एक भाग अंकुश नाना देशमुख व अंबरभाई शेख यांनी रा.कॉ.प.शरद पवार साहेब यांच्या पक्षात प्रवेश केला. यावेळी उपस्थित लक्ष्मण देवकर, विनायक कापरे, बाबासाहेब नरहरी देशमुख, सुनील देशमुख, संभाजी शितोळे व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT